# वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी पश्चिमवाडा यांचे कार्यालय
## ता.वाडा जि,पालघर,पिन कोड -४२१३०३

---

जा.क्र /१५४४/सन-२०१८-१९
पश्चिमवाडा ,दिनाक २५ /०९/२०१८

संदर्भ- १) वनक्षेत्रपाल पश्चिम वाडा यांचेकडील प्र.प्र.रि.क्रमांक -०२/२०१८-१९ दिनाक २०/०७/१८
२) श्री.सुनिल चंद्रकांत आंबवणे रा.वाडा ता.वाडा यांचा दिनांक २६/०७/१८ रोजीचा जबाब
३) मौजे आलमान ता.वाडा येथील दिनांक ०२/०८/२०१८ रोजीचा पंचनामा
४) श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा.पोशेरी ता.वाडा जि.पालघर व श्री.रमेश भागोजी पाटील रा.पालसई ता.वाडा जि.पालघर यांचा दिनांक ०२/०८/२०१८ रोजीचा जबाब
५) श्री.सुरेश अमृत ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर यांचा दिनांक ०२/०८/१८ रोजीचा जबाब
६) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर यांचा दिनांक ०२/०८/२०१८ रोजीचा जबाब
७) श्री.भगवान गजानन ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर यांचा दिनांक ०२/०८/२०१८ रोजीचा जबाब
८) श्री.रमेश काशिनाथ ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर यांचा दिनांक ०२/०८/२०१८ रोजीचा जबाब
९) वनपाल वाडा यांचे कडील जा.क्र ७३/१८-१९ दिनांक ०१/०९/२०१८ रोजीचा अहवाल
१०) मौजे आलमान येथील खातेदार १) श्री.भगवान गजानन ठाकरे २) श्री.रमेश काशिनाथ ठाकरे ३) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे ४) श्री.सुरेश अमृत ठाकरे यांचे दिनांक १७/०९/१८ रोजीचे जबाब
११) श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा.पोशेरी ता.वाडा जि.पालघर यांचा दिनाक २४/०९/२०१८ रोजीचा जबाब
१२) श्री.रमेश भागोजी पाटील रा.पालसई ता.वाडा जि.पालघर यांचा दिनाक २४/०९/२०१८ रोजीचा जबाब

**महाराष्ट्र झाडे तोड अधिनियम ( नियमन) १९६४ कलम २ व ३ अंतर्गत**

प्रकरणाचा थोडक्यात तपशिल १) दिनाक २०/०७/२०१८ रोजी वनक्षेत्रपाल पश्चिमवाडा व स्टाप यांनी श्री.सुनिल चंद्रकांत आंबवणे रा.वाडा यांच्या किरकोळ दास्तान डेपोची तपासनी केली असता सदर दास्तान डेपोतील आवक -जावक मालाची व रजिस्टरावरील नोंदीनुसार ताळमेळ केली असता सदर दास्तान डेपोत साग किटा २८७.४३४ घमी ,खैर किटा ७५.७२१ घमी ,ऐन इंजा किटा ६४९.६१२ घमी असा एकुण १०१२.७६७ घमी किटा माल व साग नग -२१ घमी २.४६१ चा वाढीव माल अवैध अनाधिकृत बिनपाशी आढळून आल्याने संबधित डेपोधारक श्री.सुनिल चंद्रकांत आंबवणे रा.वाडा यांचे विरुदध प्र.रि.क्र ०२/२०१८-१९ दिनांक २०/०७/२०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला व सदर माल जप्त करण्यात आला.

Scanned by CamScanner

३ ) दिनांक ०२/०८/२०१८ रोजी मालाच्या अधिक तपासाकामी मौजे आलमान येथील मालकी खातेदार श्री.रमेश काशिनाथ ठाकरे व इतर ०७ मालकी गट नंबर २२५ .२) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे मालकी गट नंबर २२१ ,२२९ .३) श्री.अमृत शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.सुरेश अमृत ठाकरे मा.ग.न १६८ .४) श्री.गजानन शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.भगवान गजानन ठाकरे मा.ग.न २३० यांच्या मालकी क्षेत्रातील विनापरवाना वृक्षतोड झालेल्या साग,इंजा,खैर व इतर प्रजातीचा झाडोरा तुटलेल्या झाडो-याचा बुडांचा पंचनामा वनक्षेत्रपाल पश्चिम वाडा व स्टापसमवेत पंचनामा केला व त्यांचे जबाब घेतले ,सदर खातेदार यांनी सदरचा गुन्हा अजानतेने घडल्याचे त्यांनी कबूल केले आहे.

४) सदर प्रकरणी खातेदाराकडून माल खरेदी करुन मध्यस्थीच्या भुमीकेने डेपोवर विनापरवाना वाहतुक करणारे इसम श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा.पोशेरी व रमेश भागोजी पाटील रा.पालसई यांचे जबाब दिनांक ०२/०८/२०१८ रोजी वनक्षेत्रपाल यांचे समोर नोंदविण्यात आले ,जबाबात सदर इसमांनी जास्त नफयाच्या उददेशाने मालकी खातेदाराकडून झाडे विनापरवाना तोडून तो अनाधिकृत वाहतुक केल्याचा गुन्हा कबूल केला असून शासकिय नियमाप्रमाणे होणारा दंड व नुकसानी भरणेस तयार असल्याचे सांगितले आहे.

५ ) वनपाल वाडा यांनी त्यांचेकडील पत्र क्र ७३/१८-१९ दिनांक ०१/०९/२०१८ रोजी प्राप्त अहवालानूसार मौजे आलमान येथील बिगर अनुसुचित जमातीचे मालकी खातेदार श्री.रमेश काशिनाथ ठाकरे व इतर ०७ मालकी गट नंबर २२५ .२) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे मालकी गट नंबर २२१ ,२२९ .३) श्री.अमृत शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.सुरेश अमृत ठाकरे मा.ग.न १६८ .४) श्री.गजानन शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.भगवान गजानन ठाकरे मा.ग.न २३० यांच्या मालकी क्षेत्रातील एकुण झाडे -१३०८ झांडाची विनापरवाना वृक्षतोड झाली असल्याचे नमूद केले आहे.

६) दिनांक १७/०९/२०१८ रोजी वनक्षेत्रपाल पश्चिम वाडा यांचे कार्यालयात सदर प्रकरणातील मालकी खातेदार यांनी त्यांच्या जबाबात सदर झाडे ही आम्हास वनखात्याची परवानगी घेतली आहे असे खोटे सांगुन मालकीतील झाडो-याची तोड विनापरवाना पदध्तीने ठेकेदार श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा.पोशेरी व श्री.रमेश भागोजी पाटील रा.पालसई यांनी केलेली आहे ,त्यामुळे सदर प्रकरणी होणारा दंड हा ठेकेदारांना व्हावा अशी विंनती केली आहे.

७) दिनांक २४/०९/२०१८ रोजी श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री व श्री. रमेश भागोजी पाटील यांनी वनक्षेत्रपाल पश्चिम वाडा यांचे कार्यालयात येवून मालकी खातेदारांच्या मालकीतील झाडे विनापरवाना तोड केल्याचा व अवैधरित्या वाहतूक केल्याचा गुन्हा कबूल केला असून त्याकामी होणारा दंड व नुकसानी भरणेस असल्याचे त्यांच्या जबाबाबत लिहुन दिले आहे.

**निष्कर्ष-**

मौजे आलमान येथील बिगर अनुसुचित जमातीचे मालकी खातेदार श्री.रमेश काशिनाथ ठाकरे व इतर ०७ मालकी गट नंबर २२५ .२) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे मालकी गट नंबर २२१ ,२२९ .३) श्री.अमृत शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.सुरेश अमृत ठाकरे मा.ग.न १६८ .४) श्री.गजानन शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.भगवान गजानन ठाकरे माग.न २३० यांच्या मालकीतील एकुण-१३०८ झाडे ही मालकी ठेकेदार श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा.पोशेरी व श्री.रमेश भागोजी पाटील रा.पालसई यांनी मालकी खातेदारांना गाफिल ठेवून जास्त नफा मिळवण्याच्या उददेशाने वनखात्याची परवानगी न घेता अनाधिकृतरीत्या तोड करुन त्यांची वाहतूक केल्याचे निष्पन्न होत आहे ,त्यामुळे सदरची कृती ही महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत ( विनियमन ) अधिनियम १९६४ मधील कलम (३) चा भंग ठरणारी आहे.

Scanned by CamScanner

वरील सर्व अभिलेख पुरावे यावरुन मी श्री.एच.व्ही.सापळे वृक्षअधिकारी तथा वनक्षेत्रपाल पश्चिमवाडा (प्रा ) पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

वृक्षअधिकारी यांना महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत ( विनियमन ) अधिनियम १९६४ मधील कलम (४) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**आदेश :-**

१ ) मालकी खातेदार श्री.रमेश काशिनाथ ठाकरे व इतर ०७ मालकी गट नंबर २२५ २) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे मालकी गट नंबर २२१ ,२२९ .३) श्री.अमृत शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.सुरेश अमृत ठाकरे मा.ग.न १६८ .४) श्री.गजानन शंकर ठाकरे ( मयत ) वारस श्री.भगवान गजानन ठाकरे माग.न २३० यांना त्यांच्या मालकीतील झाडोरा वनखात्याची परवानगी न घेता कोणतीही शहानिशा न करता मध्यस्थी व्दारे व्यवहार करुन झाडे तोडल्याबददल प्रत्येकी रु.५०००/- ( अक्षरी रुपये पाच हजार मात्र ) दंड करण्यात येत आहे.

२ ) श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा. पोशेरी ता.वाडा जि.पालघर व श्री.रमेश भागोजी पाटील रा.पालसई ता.वाडा जि.पालघर यांनी जास्त नफा कमवण्याच्या उददेशाने मालकी खातेदार यांची दिशाभुल करुन वनखात्याकडुन कोणतेही परवानगी न घेता मालकी खातेदारांच्या मालकीतील झाडे तोडून त्यांची विनापरवाना वाहतुक केली आहे .वृक्षतोड करताना वनखात्याची परवानी घेण्याची आवश्यकता असते हे माहित असुनही जानून -बुजून विनापरवाना विविध मालकी खातेदारांच्या मालकीतील झाडो-याची तोड केल्या बददल प्रत्येकी रु.३,२७,०००/- ( अक्षरी तिन लाख सत्ताविस हजार मात्र ) दंड करण्यात येत आहे .

सदरचा आदेश आज दिनांक २५/०९/२०१८ रोजी माझे सही शिक्यानी दिला आहे.

दिनाक २५/०९/२०१८

( श्री.एच.व्ही.सापळे )
वृक्षअधिकारी
तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी
पश्चिमवाडा

**प्रति,**

१ ) श्री.रमेश काशिनाथ ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर
२ ) श्री.सुर्यकांत शांताराम ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर
३ ) श्री.सुरेश अमृत ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर
४ ) श्री.भगवान गजानन ठाकरे रा.आलमान ता.वाडा जि.पालघर
५ ) श्री.राजेंद्र गजानन शिलोत्री रा.पोशरी ता.वाडा जि.पालघर
६ ) श्री.रमेश भागोजी पाटील रा.पालसई ता.वाडा जि.पालघर

प्रत- वनपाल वाडा यांना माहीतीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
२/०० त्यांनी सदरच्या आदेशाची एक प्रत संबधित मालकी खातेदार व ठेकदार यांना लागू करुन दुस-या प्रतिवर त्यांची दिनांकीत पोहच घेऊन या कार्यालयास सादर करावी ,तसेच दंड वसुल करण्याची कार्यवाही करावी.
प्रत-मा.उपवनसंरक्षक जव्हार वनविभाग जव्हार यांना माहीतीसाठी सविनय सादर.
प्रत-मा.सहा.वनसंरक्षक ( वनीकरण व वन्यजीव ) वाडा माहीतीसाठी सविनय सादर.

Scanned by CamScanner